
Volume 8 (Special Issue II)
April, 2018

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR
4.270
UGC Journal list No. 64768







१४ एप्रिल २०१८ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त...

# सामाजिक समतेचे प्रणेते - महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

Editor : Dr. R.V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Journal of Research & Development** Vol. 8 (Special Issue 11) April 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR - 4.270

# "सामाजिक समतेचे प्रणेते : महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर"

## अनुक्रमणिका


| Sr. No. | Name | Title of the Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Dr. Smriti Bhosle | Dr. Ambedkar's Dalit Liberation Approach | 1-4 |
| 02 | प्रा.डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ | समाजसुधारक : महात्मा ज्योतिबा फुले | 5-8 |
| 03 | प्राचार्य, डॉ एस.एस. शिंदे | डॉ.बाबासाहेबांचा जीवनपट व शैक्षणिक विचार | 9-12 |
| 04 | Dr. Ashok Pitambar Khairnar | Dr. Babasaheb Ambedkar on the Annihilation of Caste and Buddha's Dhamma | 13-18 |
| 05 | प्रा. डॉ.टी.ए. मोरे | फुले-शाहू-आंबेडकर प्रेरणा - एक दृष्टिक्षेप | 19-22 |
| 06 | प्रा.डॉ. प्रकाश अर्जुन भामरे | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मविचार | 23-26 |
| 07 | प्रा. डॉ. सुरेश आर. वराडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकारितेतील योगदान | 27-30 |
| 08 | प्रा.डॉ. विजय जी. गुरव | दलित साहित्य के प्रेरणास्त्रोत : महात्मा जोतीराव फुले | 31-33 |
| 09 | डॉ.विजया विनायक पाटील | स्त्रीयांविषयक कायदे निर्मितीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान | 34-37 |
| 10 | डॉ. संभाजी संतोष पाटील | महात्मा जोतीराव फुले यांच्या विधायक विचारधारेचा विश्लेषणात्मक अभ्यास | 38-41 |
| 11 | डॉ. भामरे नानाजी दगा | महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार | 42-44 |
| 12 | डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याची चळवळ | 45-48 |
| 13 | प्रा.डॉ. आर.एम. साळुंके | जोतिराव फुले का हंटर कमीशन से निवेदन | 49-51 |
| 14 | डॉ. महेश व्ही. गांगुर्डे | म. जोतीराव फुले की ग्रंथ-संपदा | 52-54 |
| 15 | डॉ. भगवान सतन पाटील | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान | 55-57 |
| 16 | डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना | 58-60 |
| 17 | डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | राजर्षी शाहु महाराजांची आरक्षण विषयक भुमिका | 61-63 |
| 18 | प्रा.डॉ.बालासाहेब किलचे | भारतीय लोकशाहीची सद्यस्थिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 64-67 |
| 19 | डॉ. चंद्रशेखर वाणी | डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विदेशात शिक्षण एक तपश्चर्या... | 68-70 |
| 20 | प्रा.डॉ.अंभुरे एस.डी. | छत्रपती शाहू महाराजांचे विविध कला क्षेत्र विषयक धोरण | 71-73 |


PRINCIPAL

# छत्रपती शाहू महाराजांचे विविध कला क्षेत्र विषयक धोरण

Late Ramesh Warpudkar ... Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

प्रा.डॉ.अंभुरे एस.डी. (इतिहास विभाग)
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

## प्रस्तावना :-

छत्रपती शाहू महाराजांच्या अगदी बालपणापासून त्यांच्या मल्लविद्येचा झालेले संस्कार यांचा विशेष उल्लेख आहे. शाहू महाराज करवीर घराण्याचे उच्चपदस्थव्यक्ती असून सूध्दा महाराज कुस्ती खेळत असतांना सर्व सामान्य मानसाला कुतुहल वाटत होते. इ.स.१८९४ मध्ये कोल्हापूर शहरात मंगळवारपेठेत कुस्त्यांचे मैदान भरविले होते. इ.स. १८९४ मध्ये त्यांनी मल्ल विद्येचे पुनरूज्जीवन व्हावे म्हणूनच मल्लांना भरघोस बक्षीस जाहीर केले. इ.स. १८९५ मध्ये जुन्या राजवाड्याच्या परिसरात मोतीबाग तालतीची स्थापना केली. व त्याद्वारे सामान्य तरूणांना मल्लविद्येत तरबेज करण्याचे श्रेय शाहू महाराजांना दिले जाते. छत्रपती शाहू महाराजांनी मल्लांसाठी मैदान खुले करून त्यांना उदार राजाश्रय दिला. कुस्त्या पाहण्यासाठी कोल्हापूर, सांगली, मिरज, कुरूंदवाड, जमखिंडी, कागल, निपाणी, विशालगड इ. ठिकाणीचे राजे, जाहगिरदार, सरदार यांची मल्लाच्या कुस्त्या पाहण्यासाठी भाऊगर्दी होत होती. छत्रपती शाहू महाराजांनी खासबाग येथे कुस्त्याचे मैदान तयार करून सर्व सामान्य तरूणांना मल्ल विद्येची प्रेरणा देऊन प्रोत्साहित केले. या खासबागमैदानात साधरणतः पन्नास ते साठ हजार प्रेक्षक बसतील अशी व्यवस्था केली. त्यामुळे संस्थानाच्या बाहेरच्या राज्यातील म्हणजे पंजाब, दिल्ली इ. ठिकाणी नामांकित मल्लाचे ताफे कोल्हापूरात येऊ लागले.

## छत्रपती शाहू महाराजांचे मल्ल विषयक धोरण / कार्य :-

कोल्हापूर संस्थानातील आणि इतर ठिकाणी विशेषतः मुंबई येथील बुरूजबंदाची कुस्ती नामांकित आहे. गुलाम पहेलवान हा भारतात अव्वल दर्जाचा बुरूजबंद पहेवाल होता. त्याची मुंबई मुक्काम कुस्ती होणर म्हणून महाराज कुस्ती प्रेमी असल्यामुळे जिंकणाऱ्या पहेलवानांना भेट द्यावी म्हणून एक चांदीचा गदा तयार करून घेतली.

छत्रपती शाहू महाराजांनी मल्ल विद्येचा विकास करण्यासाठी दहा कलमी कार्यक्रम जाहीर केला. ही सर्व महत्वाची दहा कलमी योजना ह्या प्रकरणात समाविष्ठ आहे. स्पृश्यास्पृश्य भावनेने उत्तरे कडील मल्लांनी अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजातील मल्लांच्या बरोबर लढतीस नकार देऊ नये म्हणून महार मल्लांना `जाट` पहेलवान तर भंगी मल्लांना पंडित पहेलवान अशी नावे दिले. सामाजिकदृष्ट्या महाराजांचे हे कार्य दूरगामी परिणातकारक ठरणारे होते. छत्रपती शाहू महाराजांनी मल्लांना खुराक देण्याची पध्दत सुरू केली. त्यासाठी महाराजानी मल्लांना दरवर्षी ३० हजार एवढी मोठी रक्कम मल्लाच्या व्यवस्थेवर खर्च होई. इ.स.१९११ मध्ये दिल्ली येथे कुस्त्या आयोजित करण्यात आल्या होत्या. छत्रपती शाहूने इ.स.१९११ मध्ये कुस्ती वरील प्रेमामुळेच ते दिल्लीला गेले होते. छत्रपती शाहू महाराज उंची पोशाखात हिरे मोती यांचा माला स्वतःच्या गळात घालून दिल्लीच्या कुस्ती मैदानात लोकांचे मन आकर्षित केले. थोडक्यात मल्ल विद्येचा पोशिंदा अशी महाराजांची प्रतिमा तयार झाली. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर त्यांची प्रतिष्ठा वाढली.

## छत्रपती शाहू महाराजांचे नाट्य कले विषयी धोरण / कार्य :-

छत्रपती शाहू महाराजांचे नाट्यकला, गायन, संगीत, मल्लविद्या या सर्व केलेची जोपासना केली. शाहू महाराजांना गुणी माणसांची पारख होती. महाराष्ट्र रंगभूमीवर चमकरणारे बालगंधर्व, नारायणराव राजहंस यांचे रूपांतर बालगंधर्व या नावाने करण्यात छत्रपती शाहू महाराजांचे फार मोठे प्रेम दिसून येते. नाट्यकलेला राजाश्रय मिळाल्यामुळे कोल्हापूर संस्थाना बरोबरच संपूर्ण महाराष्ट्रात विसाव्या शतकात सांस्कृतिक जीवन समृध्द झाले. सिनेसृष्टी गाजविणारे बाबराव पेंढारकर, गायिका सकवराबाई, चित्रकला तपस्वी आबालाल रहेमान, साहेबजन, आनंदराव पेंटर, तबलजी दादालाड, गणपत गुरव पखवाजपटु साधील बुवा इ. नामवंताची जडण घडण आणि शाहू महाराजांची कलादृष्टी या संदर्भाने या प्रकरणात विस्तृत विवेचन केले आहे.

रोमिओ ज्युलिएट यांचे भांपातरीत शशिकला - रत्नपाल हे नाटक महाराजांनी पाहिल्यानंतर त्यांना नाट्यकले विषयी आवड निर्माण झाली. त्यांनी नाट्य कलेला फार मोठा राजाश्रय दिला. छत्रपती शाहू महाराजांनी डोंगरे संगीत नाट्यकंपनी, किर्लोस्कर नाटक कंपनी, शाहूनगरवासी नाटक कंपनी, महालक्ष्मी प्रासादिक नाटक कंपनी, शेषासनी स्त्रीसंगती नाटककंपनी, स्वदेश हितचिंतक नाटक कंपनी, कोल्हापूर संगीत नाटक कंपनी, शिवराज नाटक कंपनी, यशवंत संगीत मंडळी इ. नाटक मंडळींना राजाश्रय देऊन त्यांच्या कलागुणास वाव दिला.

छत्रपती शाहू महाराजांनी नारायण राजहंस उर्फ बालगंधर्व तसेच संगीत सूर्य केशवराव भोसले यांना अंतकरणाने आर्थिक मदत देऊन त्यांना नाट्यकलेच्या क्षेत्रात व संगीत क्षेत्रात पुढे आणले. लोकमान्य टिळकांनी ना राजहंस यांच्या रंगभूमीवरील मौलाच्या कामगिरीबद्दल बालगंधर्व ही पदवी दिली. तसेच केशवराव भोसले यांना सहकार्य देऊन मराठी रंगभूमिवर त्याचा लौकिक वाढविला. ह्या प्रकरणात शाहू महाराजांनी ललित कला दर्शक १९०८ मध्ये स्थापला केली.तसेच केशवराव भोसले यांना दरमहा २५० रूपयांची तनखा मंजूर केला. या बाबींचा परिणाम कला संस्कृतीवर कसा राहिला त्याचा आढावा घेतला आहे.

इ.स. १९१६ मध्ये मानापमान या नाटकाच्या प्रयोगात बालगंधर्व व केशवराव भोसले यांची लोकप्रियता केशवरावांच्या यशाच्या मागे शाहू महाराजांचा फार मोठा हात होता. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर पॅलेस थिएटर निर्मिती केली. १८९८ मध्ये ``शिवाजी`` शिएटर बांधले. या थिएटरच्या खर्चासाठी महाराजांनी स्वत: आर्थिक मदत स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र शासनाने या शिएटरला केशवराव भोसले असे नाव दिले. छत्रपती शाहू महाराजांनी कलाच्या समुदायात संगीत, नाट्य व चित्रकलेला प्रोत्साहन दिले.

## छत्रपती शाहू महाराजांचे संगीत / गायक कले विषयी धोरण कार्य :-

छत्रपती शाहूच्या काळात नाट्य व चित्रकलेला राजाश्रय दिल्यामुळे महाराष्ट्रात कीर्तन, तमाशा, लावणी, दिंडी, फटका, भजन, वाघ्या मुरळीची गाणी इ. लोकसंगीताचे प्रकार बहारास आले. शाहू महाराजांनी गादीवर येताच इ.स.१८८३ मध्ये कोल्हापूर गायन समाज ही संस्था स्थापन केली. राजर्षी शाहू महाराजांचे मोठेपणा छत्रपती नव्हे तर ते ``लोकराजा`` या चार अक्षरी व्यापक शब्दामध्ये आहे. एका राज्यातील उच्चप्रतिष्ठीत राजा अति माणसासाठी कसा झिजतो याचे आदर्श उदाहरण म्हणजे शाहू महाराज असा उल्लेख आदर पुर्वक भावनेने करण्यात येतो.

संगीत कलेचे आश्रयदाते म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा उल्लेख केला जातो. ``खास बाग मैदान``, `` थिएटर`` या वास्तूनी कोल्हापूर संस्थानाला कलापूर असा लौकिक दिला. त्यांचे संपूर्ण श्रेय छत्रपती शाहू महाराज यांना लागते. छत्रपती शाहू महाराजांनी इ.स. १८९२ मध्ये कोल्हापूर गायन समाजाच्या चळवळीस सहकार्य दिले व या संस्थे गप्पा, गायन, वादन इ. उपक्रम चालत. देवल क्लबची स्थापना शाहू महाराजांच्या प्रेरणेने झाली. छत्रपती शाहू महाराजांनी अल्लादियाखॉं साहेब, यांची दरबारी गायक म्हणून निवड केली व त्याला शाहू दरबारात राजाश्रय दिला. अल्लादियाखॉं शिष्य परंपरा कोल्हापूर संस्थानात असून कोल्हापूरात संगीत कलेचे विद्यापिठ निर्माण झाले. या विद्यापिठातून हैदरखॉं मंजीखॉं, नय्यनखॉं, केरबाई केरकर, मोगुबाई कुंडीकर, जसदनवाला, जरीवाला, गोविंद बुवा, अंजली मालपेकर या कालाकारांना महाराजांनी मदत केली. या प्रकरणात छत्रपती शाहू महाराजांच्या संगीत कला क्षेत्रातील योगदानाचे महत्त्व लक्षात येते. छत्रपती शाहू महाराजांनी केसरबाई केरकर यांच्या कला संगीत क्षेत्रात सहकार्य देऊन एप्रिल १९३८ मध्ये केसरबाईना विश्वभारती हा ``सुरश्री`` हा किताब बहाल झाला. छत्रपती शाहू महाराजांनी अंजलीबाई मालपेकर या गायिकेला सुध्दा राजाश्रय दिला होता. इ.स. १९०५ मध्ये अंजलीबाई मालपेकर यांचा गाण्यांचा कार्यक्रम छत्रपती शाहू महाराजांच्या राजवाड्यात घडून आला. त्यावेळी नेपाळचे नरेश, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड तसेच इंदोरचे तुकोजीराव होळकर महाराज प्रमुख होते.

छत्रपती शाहू महाराजांनी अनेक शास्त्री संगीतकारांना राजाश्रय देऊन त्यांच्या द्वारे अखिल भारतीय कीर्ती संपादन केली. छत्रपती शाहू महाराज संगीतकलेचे आश्रयदाते असल्यामुळे अल्लादियाखॉं साहेब, दिल्लीचे नथ्थनखॉं, कुरूंदवाड्याचे रहिम खॉं, मिरजेचे अब्दुल करीम खॉं इ. च्या मौफिची शाहू महाराज मन:पुर्वक आस्वाद घेत असत. छत्रपती शाहू महाराजांनी भजन गायक पंडितराव करबेकर यांना राजाश्रय दिला.

## छत्रपती शाहू महाराजांचे जलसा / तमाशा कलेला राजाश्रय :-

छत्रपती शाहू महाराजांनी जलसा कलेला राजाश्रय दिला. तमाशा किंवा जलसा सार अस्सल कलेची जोपासना शाहू महाराजांनी केली. कीर्तन किंवा प्रवचन हे साधन रामायण आणि महाभारतात उपलब्ध होते. छत्रपती शाहू महाराजांनी तमाशा कलेला प्रोत्साहन दिले. त्यामुळे नाजूक पायातील घुंगराचा आवाज ऐकण्यास खेड्यातील ग्रामीण युवक उत्साहित होत होता. हे वास्तव लक्षात घेऊन तमाशा हे लोकरंजना ऐवजी लोकप्रबोधनाचे साधन ठरावे असा हेतू मनी ठेवून छत्रपती शाहू महाराजांनी तमाशाचे रूपांतर सत्यशोधक जलशात केले. टाळ, तबला वगैरे वाद्य इ. सत्यशोधक जलशांचे उपयुक्त आत्याधुनिक जलशाचे रूप बदलले. व तमाशाला जनजागरणाचे माध्यम करून टाकले. छत्रपती शाहूंनी सत्यशोधक जलासाद्वारे बहुजन समाजातील रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, अज्ञान, धार्मिक कर्मठपणावर आघात घालून सर्व समाजाला जागृत केले. जलशाच्या डफातून व तुनतूण्याच्या आवाजातून समाज परिवर्तनाचे कार्य केले.

छत्रपती शाहू महाराजांनी शाहिरी कलेच्या क्षेत्रात सुध्दा राजाश्रय देऊन अज्ञानी बहुजनांसाठी मनोरंजन आणि प्रबोधनाच्या कलेचा वापर करून जनसामान्यांत जागृतीचे कार्य केले. छत्रपती शाहू महाराजांनी शाहिरी परंपरेतील कलावंतास उत्तेजन दिले. त्यामुळे शाहू महाराजांच्या काळात अज्ञानदास, तुलसीदास, यमाजी या सारखे शाहीर उदयास आले. छत्रपती शाहू महाराजांनी ढोणे या शाहिराकडून समाजशिक्षणाचे कार्य यशस्वीरित्या पार पाडले.

**समारोप :-**

छत्रपती शाहू महाराज करवीर संस्थान कोल्हापूरचा राजा असले तरी त्यांनी जनसामान्यात सर्व कलेच्या क्षेत्रातील कलाकारांना राजाश्रय देऊन व जनसामान्यात स्वत: सहभाग घेऊन मल्लविद्या, नाट्यसंगीत, पोवाडे, शाहिरी, चित्रकला इ. क्षेत्रात समान्य कलाकारांना प्रोत्साहित केले व जनसामान्यांचा राजा म्हणजेच जाणता राजा असे छत्रपती शाहू महाराजांस लोकांकडून प्रसिध्दी संपादन केली.

**संदर्भ सूची :-**

१) मधु सावंत - राजर्षी शाहू महाराज पान क्र. ७
२) डॉ.रमेश जाधव - लोकराजा शाहू छत्रपती पान क्र. ३१७
३) हिंदुराव साळुंके - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ पान क्र. १०८
४) डॉ.जयसिंग पवार - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ पान क्र. २५०
५) डॉ.विलास सांगवे - राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स खंड
६) प्रा.रघुनाथ कडवे - लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज
७) प्रा.अशोक खोत - दैनिक मुंबई भीमप्रकार लेख दि. २८ जुलै १९९७

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

-------------------------------*****-------------------------------